सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १४ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १४ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# उद्धव ठाकरे अन् मविआ नेत्यांसोबत राज ठाकरे मंत्रालयात

## मुख्य निवडणूक अधिकाऱ्याशी एकत्र चर्चा, 'इंजिना'ची ठरली दिशा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चा रंगल्या आहेत. तसे संकेत दोन्ही पक्षातून दिले जात आहे. त्यात संजय राऊतांनी राज ठाकरेमहाविकास आघाडीत येण्यास इच्छुक असल्याचे म्हटल्यानंतर या चर्चेला आणखी हवा मिळाली. त्यानंतर मंगळवारी पहिल्यांदाच राज ठाकरे महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबत दिसले. शरद पवार, राज ठाकरे, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात आणि इतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. या भेटीचे वेगवेगळे अर्थ काढले जात असून, मनसेच्या 'इंजिना'ची दिशा ठरल्याचे बोलले जात आहे.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांची विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना (युबीटी) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सुभाष लांडे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अजित नवले, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड, समाजवादी पक्षाचे रईस शेख, आमदार जयंत पाटील यांच्यासह इतर नेतेही यावेळी उपस्थित होते. उद्धव ठाकरेंनीही निवडणूक





अधिकाऱ्याचे काही मुद्द्यांकडे लक्ष वेधले. अनेक ठिकाणी खोटं मतदान झाले आहे. त्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, असेही ठाकरे म्हणाले.

### राज ठाकरे पहिल्यांदाच 'मविआ' नेत्यांसोबत

## फडणवीस म्हणाले कोण कोणासोबत जाणार या गोष्टी आमच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या नाहीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई–**

पहिल्यांदाच राज ठाकरे महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबत दिसले. शरद पवार, राज ठाकरे, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात आणि इतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. या भेटीचे वेगवेगळे अर्थ काढले जात असून, मनसेच्या 'इंजिना'ची दिशा ठरल्याचे बोलले जात आहे. या भेटीपूर्वी राज ठाकरेंच्या महाविकास आघाडीच्या जवळीकविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोण कोणाला भेटत आहे, कोण कोणासोबत जाणार आहे, या गोष्टी आमच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या ठरत नाही. महाराष्ट्रासाठी कोण काम करतोय, कोण या राज्याचे नेतृत्व करू शकतो, हे जनतेला चांगले माहिति आहे, असे देवेंद्र फडणवीस



यांनी सांगितले.स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये राज्यातील जनता महायुतीला विजयी करणार आहे. संपूर्ण राज्य आमच्या पाठीमागे असून पुन्हा एकदा महापालिका आणि जिल्हा परिषदांवर भगवा फडकणार आहे. विधानसभेप्रमाणेच या निवडणुकीतही भाजप आणि मित्र पक्षांना यश मिळणार आहे. त्यामुळे कोणाच्या भेटीचा किंवा कुठे जाण्याचा आमच्यावर काहीही परिणाम होणार नाही, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.क्रिया दिली.

### स्वेटर, कानटोपी, हातमोजे अन् ब्लँकेट...! तयार ठेवा

# ११० वर्षानंतर तिसरा कड्याक्याचा हिवाळा राहणार

## ८६ टक्के हिमालयाला बर्फाने आच्छादले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नवी दिल्ली–**




देशभरात मुसळधार पावसाने कहर मांडलेला असतानाच आता कडाक्याची थंडी ती देखील गेल्या १०० वर्षांतील तिसरी सर्वात जास्त थंडीची लाट पसरणार आहे. स्वेटर, कानटोपी, हातमोजे अन् ब्लँकेट आदी देखील कमी पडतील एवढा गारवा पडणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. यावर्षीचा हिवाळा हा मागील ११० वर्षांतील तिसरा सर्वात थंड हिवाळा असण्याची दाट शक्यता हवामानतज्ज्ञांनी दिला आहे. प्रशांत महासागरातील 'ला–निना' या नैसर्गिक हवामान बदलाच्या पॅटर्नमुळे यंदा भारतात थंडीची लाट अधिक तीव्र आणि दीर्घकाळ टिकणारी असेल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. ला–निना ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये प्रशांत महासागरातील पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा थंड होते. याचा परिणाम जागतिक हवामान प्रणालीवर होतो आणि भारतात अनेकदा यामुळे कडाक्याची थंडी पडते.

**उत्तर भारतात प्रभाव :** दिल्ली, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांसह उत्तर भारताच्या अनेक भागांत तापमानात मोठी घट दिसून येईल.हवामान विभागाच्या (खचऊ) अंदाजानुसार, जर ला–निना पूर्णपणे विकसित झाला, तर तो हवामान बदलामुळे होणारा तापमानाचा वाढता परिणाम काही प्रमाणात कमी करेल आणि भारतात अनेक दशकांतील सर्वात तीव्र थंडी अनुभवायला मिळू शकते. यामुळे शेती आणि जनजीवनावर याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता असल्याने, नागरिकांना आणि प्रशासनाला या बदलांसाठी आतापासूनच तयारी करण्याचे आवाहन तज्ज्ञांकडून केले जात आहे.

**तीव्र थंडीची लाट:** उत्तर आणि मध्य भारताच्या मैदानी प्रदेशात कडाक्याची थंडी वाढू शकते. **कालावधी:** थंडीचा कालावधी सामान्य वर्षांच्या तुलनेत अधिक लांबण्याची शक्यता आहे.

# महाविकास आघाडी नव्हे महाकन्फ्यूज आघाडी

## पराभव समोर दिसत असल्याने तक्रारींचा पाढा वाचण्यासाठी निवडणूक आयोगाकडे धाव - एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई–** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य निवडणूक आयोगाची भेट घेणाऱ्या महाविकास आघाडीच्या नेत्यांवर तिखट शब्दांत हल्ला चढवला आहे. ही महाविकास आघाडी नव्हे तर महाकन्फ्यूज आघाडी आहे. डोळ्यापुढे पराभव दिसत असल्यामुळे तक्रारींचा पाढा वाचण्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाकडे धाव घेतली आहे, असे ते म्हणाले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीच्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या तिन्ही घटकपक्षांच्या एका शिष्टमंडळाने आज राज्याचे मुख्य



निवडणूक आयुक्त चोकलिंगम यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी आयोगाला देशातील लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास अधिक बळकट होण्यासाठी आगामी निवडणुकांत पूर्ण पारदर्शकता बाळगण्याची विनंती केली. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या या शिष्टमंडळाला टोला हाणला आहे.

### महाविकास आघाडीत कुणाचा कुणाशी पायपोस नाही

एकनाथ शिंदे येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, विरोधी पक्षांचे शिष्टमंडळ आपल्या तक्रारींचा पाढा वाचण्यासाठी निवडणूक आयोगाकडे आले आहे. ही महाविकास आघाडी नाही तर महाकन्फ्यूज आघाडी आहे. त्यांच्यात एवढे कन्फ्यूजन आहे की, कोण काय बोलते हे काहीच समजत नाही. कुणाचा कुणाशी पायपोस नाही. त्यामुळे हे कन्फ्यूज लोक एकत्र आलेत.

### विरोधकांकडून रडीचा डाव खेळणे सुरू

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, मी एवढेच सांगेन की, जेव्हा – जेव्हा महाविकास आघाडीला विजय मिळाला, तेव्हा तेव्हा त्यांनी तक्रारींचा पाढा केव्हाच वाचला नाही. पण पराभव झाल्यानंतर मात्र त्यांनी हा पाढा वाचला. अगदी त्यांनी निवडणूक आयोग व न्यायालयासह सर्वांवरच आरोप केले. आत्ताही याठिकाणी त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांना त्यांचा पराभव दिसत आहे. त्यामुळे ते रडीचा डाव खेळण्यासाठी निवडणूक आयोगाकडे आले आहेत. पण महाराष्ट्रातील जनता सुज्ञ आहे. महाराष्ट्रातील जनता काम करणाऱ्या, विकास करणाऱ्या व लोकाभिमूख योजना राबवणाऱ्या, शेतकऱ्यांच्या पाठिशी उभ्या राहणाऱ्या महायुती सरकारच्या मागे उभे राहील. विरोधक कितीही एकत्र आले तरी महायुती आगामी निवडणुकांत प्रचंड यश मिळवेल व विजय मिळवेल, असा ठाम विश्वास एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

# आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी ५०० कोटी

## राज्य मंत्रिमंडळाच्या महत्त्वाचा निर्णय; बांबू उद्योग धोरणही जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज तीन महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. या निर्णयांमुळे शिक्षण, उद्योग आणि न्यायव्यवस्था या तिन्ही क्षेत्रांमध्ये मोठी गती येणार आहे. त्यात सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी ५०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या प्रस्तावानुसार, राज्य सरकारने बाबासाहेब आंबेडकरांच्या द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या



विकासासाठी व्यापक योजना मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत सोसायटीच्या अधीन असलेल्या मुंबई आणि छत्रपती संभाजीनगरमधील नऊ शैक्षणिक संस्था आणि दोन वसतिगृहांचे जिर्णोद्धार आणि अद्ययावतीकरण करण्यात येणार आहे.या कामांसाठी पुढील पाच वर्षांत ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या माध्यमातून बाबासाहेबांनी उभारलेल्या संस्थांचे आधुनिकीकरण, संरचनात्मक सुधारणा आणि विद्यार्थ्यांसाठी आधुनिक सुविधा उभारण्याचा मानस राज्य सरकारने व्यक्त केला आहे. शिक्षण क्षेत्रातील हा निर्णय समाजातील वंचित घटकांना अधिक सक्षम शैक्षणिक संधी देणारा ठरणार आहे.

# नेहरु मैदानावरील कचरा तात्काळ हटवा

## जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती,**

अमरावती शहराच्या मध्यवर्ती भागातील नेहरु मैदान परिसरात मोठ्या प्रमाणात टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे निर्माण झालेल्या आरोग्य आणि पर्यावरणाच्या गंभीर समस्येवर जिल्हा प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशीष येरेकर यांनी आज तातडीचे आदेश जारी करून, या परिसरातील संपूर्ण कचरा फक्त ४८ तासांच्या आत उचलण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत जारी केलेल्या आदेशानुसार, शहरातील शिट नंबर ५५ ए, प्लॉट नंबर १/१ (नेहरु मैदान) या १३ हजार ६२७.८१ चौ. मी. क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात आहे. यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, साथीचे रोग पसरण्याची भीती नाकारता येत नाही. महाराष्ट्र



प्रदूषण नियंत्रण मंडळानेही (चझउइ) या कचऱ्यामुळे प्रदूषण होत असल्याचे कळविल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ३० नुसार नेहरु मैदानावरील सर्व कचरा (केरकचरा) त्वरित उचलण्याचे निर्देश दिले आहे. कचरा उचलल्यानंतर त्वरित त्या ठिकाणी योग्य निर्जंतुकीकरण आणि स्वच्छता मोहीम राबवावी. कचरा उचलण्याची संपूर्ण प्रक्रिया पुढील ४८ तासांत पूर्ण करावी. यापुढे या परिसरात पुन्हा कचरा साठणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. या आदेशाची अंमलब जावणी न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियमा नुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे.

# शिक्षक मतदारसंघाच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर

## नोंदणीसाठी ६ नोव्हेंबर अंतिम मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ यांच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने घोषित केला आहे. यासाठी १ नोव्हेंबर २०२५ ही यासाठी अर्हता दिनांक निश्चित करण्यात आली आहे. अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघांसाठी हा कार्यक्रम राहणार आहे.

मतदार नोंदणीसाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीने दि. ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नमुना १९ मध्ये आपला अर्ज सादर करावा. यासाठी मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१ (४) नुसार प्रसिद्ध केलेल्या नोटीसची प्रथम पुनर्प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर नोटीस जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, सर्व पंचायत समिती, सर्व नगर परिषद कार्यालयांच्या नोटीस बोर्ड आणि संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

यासंबंधीचा सर्व तपशील मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आणि विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्या amravatidivision.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

## संपादकीय ......

# अन्य पक्ष आघाडीवर, काँग्रेस पिछाडीवर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी इतर पक्षांनी तयारी सुरू केलेली असताना महाविकास आघाडीतील काँग्रेसची काय परिस्थिती आहे? अद्यापही काँग्रेसला सूर सापडलेला नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी नगार्यावर टिपरी पडली आहे. ताशे-वाजंत्र्यांचा गजर सुरू झाला आहे. घोडामैदान वेशीवर आहे आणि अगदी काही काळातच महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची घोषणा होणार आहे. अशी सारी लगीनघाई सुरू असताना महायुतीतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या तिन्ही पक्षांनी निवडणुकीसाठी जय्यत तयारी केली आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे शिवसेनेची तयारी चालली आहे आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही थोड्याफार हालचाली चालवल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील तिसरा घटक पक्ष काँग्रेसची काय परिस्थिती आहे? अद्यापही या पक्षाला सूर सापडल्याचे दिसत नाही की ओढून ताणून चंद्रबळ आणण्याचे सोंगही काढता आलेले नाही.

भाजपची संघटन शक्ती मुळातच जबरदस्त आहे आणि दिवसेंदिवस त्यात भरच पडत आहे. एखाद्या जिल्ह्याचा अपवाद वगळता राज्याच्या सर्व विभागांत भाजपची तगडी ताकद आहे. २०२४ मध्ये महायुतीने भाजपच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. लाडक्या बहिणींसह अनेक धोरणात्मक निर्णयामुळे, त्याप्रमाणे पायाभूत सुविधामध्ये क्रांतिकारक सुधारणांमुळे प्रामुख्याने भाजप आणि महायुतीविषयी विश्वासार्हता निर्माण झाली आहे आणि भाजपची गेल्या सव्वा वर्षात झपाट्याने घोडदौड सुरू आहे. याच काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या निर्णयाने आणि त्यांच्या धडाकेबाज अंमलबजावणीने भाजपची प्रतिमा उजळून निघाली आहे. अमेरिकेने घातलेल्या टॅरिफ निर्बंधांना भारताने कस्पटाचीही किंमत दिली नाही. त्यामुळे ही प्रतिमा आणखी लखलखीत झाली आहे. अशी अनेक कारणे भाजपच्या सामर्थ्यात भर घालणारी ठरली आहेत. या सार्या मुद्द्यातून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपचे पारडे वरचढ राहण्याचीच चिन्हे आहेत.महायुतीतील शिंदे शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनीही धडाक्याने तयारी चालवली आहे. दोन्ही पक्षांचे विभागवार, जिल्हावार मेळावे होत आहेत आणि काही ठिकाणी उमेदवारांची प्राथमिक यादीही तयार होत आहे. मुंबई, ठाणे, कोकणवर शिंदे सेनेचे लक्ष केंद्रित आहे आणि उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग येथेही लढत देण्याची तयारी शिंदे शिवसेनेने केल्याचे दिसत आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही चांगलीच तयारी चालवली आहे. पक्षाने पश्चिम महाराष्ट्रात, मराठवाड्यात, उत्तर महाराष्ट्रात व अन्य ठिकाणीही ताकद लावली आहे. या पक्षाचे आमदार त्या त्या भागातील मातब्बर नेते आहेत. त्यांच्यामागे पक्षाचे संघटन आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या माध्यमातून आगामी विधानसभा निवडणुकीची व्यूहरचना करण्याचाही या नेत्यांचा मनसुबा असल्याचे दिसून येते.

महायुतीतील घटक पक्ष अशा पूर्ण ताकदीने रणांगणात उतरलेले असताना महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे काम चालले आहे. यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत डोळ्यांत भराव्यात अशा हालचाली आहेत. उद्धव यांच्या पक्षाचा दसरा मेळावा उत्साहात झाला. महत्त्वाचे म्हणजे गेल्या दोन महिन्यांपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोघा भावंडांमध्ये टाळी देण्याच्या हालचाली चालू आहेत आणि आता या हालचाली अंतिम टप्प्यात आहेत, असे दिसते. तसे झाले, तर समाधानकारक जागावाटप झाले आणि मुंबईसह कोकणातील लढती रंगतदार होण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांनी अशा हालचाली चालवल्या असताना शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काही हालचाली चालल्याचे दिसते. आपली ताकद किती, याचा सारासार विचार या पक्षाच्या नेत्यांनी कितपत केला आहे, हे काही समजत नाही; पण या पक्षाच्या नेत्या आणि खा. शरद पवार यांच्या कन्या खा. सुप्रिया सुळे यांनी स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत. आता यावरून एकत्रित आघाडी म्हणून या पक्षाला लढायचे आहे की नाही, असाच प्रश्न निर्माण होतो आणि त्यांच्या निवडणूक तयारीसाठी अंदाज बांधता येतो.राहता राहिला काँग्रेस पक्ष. एकेकाळी संपूर्ण राज्यातील जिल्हा परिषदांवर या पक्षाचे अधिराज्य होते. विलासराव देशमुखांसारखे मुख्यमंत्री, अनेक मंत्री, किती तरी आमदार जिल्हा परिषदांतून पुढे आले. अशा या पक्षाची विद्यमान अवस्था दयनीय आहे. मोजक्या जिल्ह्यांत थोडेफार संघटन आणि दोन आकडी आमदार अशी ताकद असलेल्या या पक्षाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कितपत प्रभाव पाडता येईल, हे प्रश्नचिन्हच आहे. त्या ताकदीनिशी निवडणुकीची तयारी करायची तर परस्पर विसंगती, बेदिली ही परंपरागत वैशिष्ट्ये आणि उणिवा डोके वर काढलेल्या, अशा स्थितीत हा पक्ष आताच पिछाडीवर असल्याचा निष्कर्ष काढला, तर तो चुकीचा ठरणार नाही.

उद्धव आणि राज ठाकरे हे दोघे बंधू एकत्र येण्याच्या दृष्टीने हालचाली चालू आहेत. अशी युती झाली, तर राज यांना महाविकास आघाडीत घेता येणार नाही, अशी भूमिका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतली आहे. राज यांना आघाडीत घ्यायला त्यांचा विरोध दिसतो आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) खा. सुप्रिया सुळे यांनी स्वबळावर लढण्याचे सूतोवाच केले आहे. या परस्पर विसंगत भूमिकांमुळे महाविकास आघाडीपुढे प्रश्नचिन्ह उभारण्याचीही शक्यता निर्माण झाली आहे.

# डाळिंबाचे हस्त बहरात रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी काय उपाय करावेत?




**दि.१४ विदर्भ प्रजासत्ताक**

डाळिंबाचे हस्त बहारातील व्यवस्थापन करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या काळात पाऊस, ऊन, धुके आदींचे वातावरण पाहायला मिळते. यामुळे रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी काय उपाय करावेत, हे समजून घेऊयात...

पानगळीनंतर लगेच ताज्या तयार केलेल्या १ टक्का बोर्डो मिश्रणाची एक फवारणी करावी.

सॅलिसिलिक सिड ०.३ ग्रॅम आणि सूक्ष्म अन्नद्रव्य मिश्रणाची २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फुलधारणेपूर्वीपासून एक महिन्याच्या अंतराने प्रत्येकी चार फवारण्या कराव्या.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

बोर्डो मिश्रण ०.५ टक्का किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड (५० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम किंवा कॉपर हायड्रॉक्साइड (५३.८ डीएफ) १.५-२ ग्रॅम अधिक स्टीकर स्प्रेडर ०.५ मिली प्रति लिटर पाणी: या व्यतिरिक्त २-ब्रोमो, २-नायट्रोप्रोपेन-१, ३ डायोल (ब्रोनोपॉल ९५.८ डीएफ) ०.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे १० दिवसांच्या अंतराने फवारावे. जर बागेत आधीपासूनच तेलकट डागाचा प्रादुर्भाव असेल, तर कासुगामायसिन २ मिली प्रति लिटर पाणी हे महिन्यातून एकदा आणि ७-१० दिवसांच्या अंतराने ब्रोनोपॉल फवारावे.

गरजेपेक्षा अधिक फवारण्या टाळाव्यात.

जर पाऊस झाला असेल, तर लगेचच कासुगामायसिन + कॉपरजन्य बुरशीनाशकाची फवारणी करावी.

बागेमधील बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावानुसार कॉपरजन्य बुरशीनाशके बदलून योग्य बुरशीनाशके वापरावीत.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## आयुर्वेद सांगतो या ९ धातूंच्या नियमित वापराचे अद्भुत फायदे

**दि.१४ विदर्भ प्रजासत्ताक**

तुमच्या स्वयंपाकघरातील भांडी तुमच्या आरोग्यावर कसा परिणाम करतात, हे खालीलप्रमाणे पाहूया:

**१. सोने**- आरोग्यदायी आहे? होय.

फायदे: सोन्याच्या भांड्यांमध्ये ऊर्जा आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे गुणधर्म आहेत.

तोटे: सोने खूप महाग आहे, त्यामुळे रोजच्या वापरासाठी ते शक्य नाही.

**२. चांदी**- आरोग्यदायी आहे? होय.

फायदे: चांदीचे भांडे थंड असते आणि त्यात बॅक्टेरिया नष्ट करण्याचे गुणधर्म असतात.

तोटे: चांदीच्या भांड्यात प्रोत्साहक गोड (उत्पादने) खाऊ शकत नाही.

**३. कांसा (पितळ, कांस्य)**- आरोग्यदायी आहे? होय.

**फायदे:** पितळ किंवा कांस्य धातूच्या भांड्यात खाल्ल्याने पचनशक्ती वाढते आणि आम्लपित्त कमी होते.

**तोटे:** या भांड्यात दूध आणि आंबट वस्तू ठेवू नयेत.

**४. तांबे**- आरोग्यदायी आहे? होय.

**फायदे:** तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी शुद्ध होते आणि ते यकृत मजबूत करण्यास मदत करते.

**तोटे:** तांब्याच्या भांड्यात दाल-दूध सारख्या वस्तू ठेवू नयेत.

**५. पितळ**- आरोग्यदायी आहे? होय.

**फायदे:** पितळेची भांडी रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी मदत करतात.

**तोटे:** या भांड्यात ठेवलेले दूध-दही लवकर खराब होतात.

**६. लोखंड**- आरोग्यदायी आहे? होय.

**फायदे:** लोखंडाच्या भांड्यात स्वयंपाक केल्याने शरीरातील लोहाची (खीप) कमतरता दूर होते.

**तोटे:** लोखंडी भांडी आंबट वस्तू ठेवण्यासाठी चांगली नसतात आणि त्यांना गंज लागण्याची शक्यता असते.

**७. स्टील**- आरोग्यदायी आहे? होय.



**फायदे:** स्टीलची भांडी टिकाऊ आणि सुरक्षित असतात.

**तोटे:** स्टीलच्या भांड्यांचे विशेष आरोग्य फायदे नाहीत.

**८. ल्युमिनियम**- आरोग्यदायी आहे? नाही.

**फायदे:** ल्युमिनियम हलके असते.

तोटे: ल्युमिनियम हे हानिकारक मानले जाते आणि त्यामुळे अल्झायमर सारख्या आजारांचा धोका वाढू शकतो. ल्युमिनियमची भांडी वापरणे टाळावे.

**९. मातीची भांडी**- आरोग्यदायी आहे? होय.

**फायदे:** मातीच्या भांड्यात शिजवलेले जेवण चविष्ट असते आणि ते जेवण गरम ठेवते.

**तोटे:** मातीची भांडी नाजुक असल्याने ती तुटण्याची शक्यता असते आणि त्यांची जास्त काळजी घ्यावी लागते.

**आरोग्यासाठी निष्कर्ष**

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, प्रत्येक धातूचे स्वतःचे महत्त्व आहे, परंतु रोजच्या वापरात लोखंड, तांबे आणि मातीची भांडी वापरणे शरीरासाठी सर्वाधिक फायदेशीर ठरू शकते. ल्युमिनियमची भांडी मात्र आरोग्यासाठी सर्वात हानिकारक ठरतात. त्यामुळे स्वयंपाकघरात भांडी निवडताना केवळ सोय न पाहता, आरोग्याच्या दृष्टीने ते किती फायदेशीर आहेत, याचा विचार करणे आवश्यक आहे.

## शिक्षक मतदारसंघ निवडणूक

# मुख्याध्यापकांच्या कार्यशाळेत मतदार नोंदणीबाबत मार्गदर्शन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१४अकोला ४,**

अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार संघाच्या दि. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने माध्यमिक आणि त्याहून वरील दर्जाच्या शाळांच्या मुख्याध्यापकांची कार्यशाळा आज नियोजनभवनात घेण्यात आली. अकोला जिल्ह्यातील सर्व पात्र शिक्षकांनी विहित नमूना-१९ मधील अर्ज आवश्यक पुरावे व प्रमाणपत्रांसह दाखल करावेत. यादीचे काम परिपूर्ण होण्यासाठी मुख्याध्यापकांनी योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षक मतदारसंघासाठीच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्याबाबत कार्यक्रम व वेळापत्रकाची माहिती सर्वांना दिली.मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१(३) अन्वये जाहीर सूचना दि.३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, सूचनेची प्रथम पुनर्प्रसिध्दी दि.१५ ऑक्टोबर रोजी होईल. वर्तमानपत्रातील नोटीसीची व्दितीय पुनर्प्रसिध्दी दि.२५ ऑक्टोबर रोजी होईल. नमूना-१९ व्दारे अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ६ नोव्हेंबर आहे. हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई दि.२० नोव्हेंबर रोजी होईल. प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दि.२५ नोव्हेंबर होईल.



दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी दि.२५ नोव्हेंबर ते दि. १० डिसेंबर असा आहे. दावे व हरकती निकाली काढणे व पुरवणी यादी तयार करणे, छपाई करणे यासाठी दि.२५ डिसेंबर हा दिवस निश्चित आहे. मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी दि.३० डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे.

मत्त

नोंदणी कार्यक्रमासाठी अमरावती विभागीय आयुक्त हे मतदार नोंदणी अधिकारी असून अकोला जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी आहेत. त्याचप्रमाणे जिल्हयातील सर्व उप विभागीय अधिकारी हे सहायक मतदार नोंदणी असून जिल्हयातील सर्व तालुक्यांचे तहसीलदार हे पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांच्या कार्यालयामध्ये नमूना-१९ मधील अर्ज दि. ६ नोव्हेंबरपर्यत सादर करता येतील.नमूना-१९ मधील अर्ज वरील ठिकाणी तसेच मुख्य निवडणूक अधिका-यांच्या संकेतस्थळावर व अकोला जिल्हा प्रशासनाच्या https://akola.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सर्व पात्र शिक्षकांच्या नोंदणीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांचे मार्गदर्शन

### मांजरखेड येथे बांबू परिषद उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती-** शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व पर्यावरण संतुलनासाठी मांजरखेड, ता. धामणगाव येथे बांबू परिषद उत्साहात पार पडली. या परिषदेला राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी मार्गदर्शन केले.या परिषदेला आमदार प्रताप अडसड, सरपंच पल्लवी देशमुख, नंदूभाऊ खेरडे, शैलेश खेरडे, बांबू लागवड तज्ज्ञ संजय चरपे, तालुका कृषी अधिकारी संचित भाकरे, रावसाहेब रोठे, प्रदिप जळीत आदी उपस्थित होते.पाशा पटेल म्हणाले, बांबू लागवडीकडे पंजाब आणि अमेरीकेसारख्या देशाने दुर्लक्ष केले आहे. बांबूमध्ये कार्बनचे प्रमाण कमी करण्याची क्षमता आहे. बांबूचा विविध उपयोग होत आहे.



बांबूपासून कपडे, शाल तसेच लोणचेही बनविता येते. मात्र आपल्याकडे याची माहिती आणि महत्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नाही. आपल्या क्षेत्रात बांबू नसल्याने त्यावर आधारीत उद्योगही कमी आले आहेत. बांबूची लागवड झाल्यास उद्योग येण्यास मदत होणार आहे. रोजगार हमी योजनेतून बांबूची लागवड केल्यास शेतकऱ्यांना चार वर्षात सात लाख रूपयांचे अनुदान मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नाल्याकाठी बांबू लागवड करावी. यामुळे जमिनीला पकड राहत असल्याने बांबूचा उपयोग पूर प्रतिबंधक म्हणून होतो. त्यासोबतच वादळाचा सामना करण्यासाठीही बांबू उपयोगी पडत असल्याचे सांगितले.

# हवेतच कतार एअरवेजच्या विमानात बिघाड

## अहमदाबादमध्ये इमर्जन्सी लँडिंग, मोठा अपघात टळला!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अहमदाबाद**

दोहाहून हाँगकाँगला जाणाऱ्या कतार एअरवेजच्या एका विमानाचे अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करावे लागले. या विमानात मोठा तांत्रिक बिघाड झाल्याने वैमानिकाने अहमदाबादविमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्याचा निर्णय घेतला. या घटनेमुळे विमानतळावर मोठी खळबळ उडाली. ही घटना आज (१४ ऑक्टोबर २०२५) दुपारच्या सुमारास घडली असून सुदैवाने विमानातील सर्व प्रवासी सुरक्षित आहेत.विमानतळाच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, दोहा ते हाँगकाँग या विमानात तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती मिळताच, दुपारी २:१२ वाजता अहमदाबाद विमानतळावर पूर्ण आणीबाणी जाहीर करण्यात आली. विमानाचे दुपारी २:३२ वाजता सुरक्षितपणे लँडिंग करण्यात आले. त्यानंतर अवघ्या सहा मिनिटांत म्हणजे २.३८ वाजता 'पूर्ण आणीबाणी' मागे घेण्यात आली. या संपूर्ण घटनेदरम्यान विमानतळाचे कामकाज सुरळीत राहिले आणि इतर उड्डाणांवर कोणताही परिणाम झाला नाही.

# तळेगाव ठाकूर येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १४ तळेगाव ठाकुर**

७तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे १३ व १४ ऑक्टोबर २०२५ रोजी रुद्र गौरक्षण गो संवर्धन अनुसंधान चॅरिटेबल ट्रस्ट आणि न्यू आशारथ लोकसंचालित साधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय मोफत नेत्र तपासणी शिबीर पार पडले. शिबिराचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाले. प्रमुख पाहुणे सौ. कल्पना दिवे, सौ. दर्शना मारबदे, किशोर दिवे आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरात सुमारे ३०० नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. काही रुग्णांना मोतीबिंदूवरील पुढील उपचारांसाठी मार्गदर्शनही करण्यात आले. भारत ऑप्टिकल व आय केअर सेंटर अकोला यांच्या तज्ञ टीमने सेवा दिली. अध्यक्ष मनोज कोडापे यांच्या नेतृत्वाखाली ट्रस्ट व साधन केंद्राच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर


क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १४ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

# नांदगाव पेठ जिल्हा परिषद सर्कलमध्ये महिला आरक्षणानंतर राजकीय समीकरणे पालटली

## गुल्हाने, हटवार, केचे,इंगळे, ठाकरेंची मोर्चेबांधणी सुरू


मनीषा गुल्हाने मनीषा हटवार सुनंदा केचे जिल्लेश्वरी ठाकरे योगेश्वरी इंगळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ नांदगाव पेठ**

नांदगाव पेठ जिल्हा परिषद सर्कलमध्ये सर्वसाधारण महिला आरक्षण लागू झाल्यानंतर राजकीय वातावरणात मोठी उलथापालथ सुरू झाली आहे. या सर्कलचा राजकीय इतिहास नेहमीच रंगतदार राहिला असून, आता पुन्हा एकदा महिला नेतृत्वाची नव्या जोमाने परीक्षा होणार आहे.एका दशकापासून या सुवर्णकाळाची प्रतीक्षा करणाऱ्या अनेक पुरुष उमेदवारांच्या स्वप्नांवर पाणी फेरल्या गेले असले तरी आपले एका तपाचे परिश्रम व्यर्थ न जाऊ देता क्षणार्धात आपल्या गृहलक्ष्मीला निवडणुकीच्या रणांगणात उभे केले आहे.आरक्षण सोडतीनंतर लगेच पोस्टरवॉर करून नांदगाव पेठ जिल्हा परिषद सर्कलमधील निवडणुकीचे चित्र थोडेफार तरी स्पष्ट झाले आहे. काँग्रेसचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या या मतदारसंघात गेल्या दोन दशकांत तीन वेगवेगळ्या पक्षांनी सत्ता गाजवली आहे. २००१ मध्ये शिवसेनेचे नितीन हटवार २००६ मध्ये शिवसेनेच्या मनीषा नितीन हटवार, २०११ मध्ये काँग्रेसचे विनोद डांगे, तर २०१७ मध्ये भाजपच्या भारती गेडाम यांनी विजय मिळवून पक्षाच्या विजयश्रीची नोंद केली होती.राज्यात आणि देशात भाजप सत्तेत असल्याने आणि स्थानिक स्वराज्य संस्थांवर भाजप आणि मित्रपक्षांनी विजयाचा दावा ठोकल्याने यावेळीभाजपकडून मनीषा विवेक गुल्हाने या प्रबळ दावेदार म्हणून समोर आल्या आहेत. त्यांचे पती व भाजप चे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी गेल्या आठ वर्षांत मतदारसंघात सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि रुग्णसेवा या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्थानिक स्तरावर पाय रोवलेल्या गुल्हाने दाम्पत्याने विकासाच्या माध्यमातून आपला जनाधार मजबूत केला आहे. त्यामुळे मनीषा गुल्हाने या भाजपकडून निर्णायक उमेदवार ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जाते. दुसऱ्या बाजूला, शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून मनीषा नितीन हटवार या पुन्हा मैदानात उतरण्याची तयारी करीत आहेत. २००६ मध्ये त्यांनी या मतदारसंघात भगवा फडकवत शिवसेनेला जिल्हा परिषदेत स्थान मिळवून दिले होते. नितीन हटवार हे वयाच्या विसाव्या वर्षापासून सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असून, त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेच्या योजना गावोगाव पोहोचल्या. त्यामुळे या दाम्पत्याचा सामाजिक पाया मजबूत असून, हटवार कुटुंब पुन्हा एकदा आपला गड राखण्यासाठी सज्ज झाले आहे.तर काँग्रेसकडून सुनंदा जनार्दन केचे या संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत आहेत. त्यांचे कुटुंब पारंपरिक काँग्रेस विचारसरणीचे असून, नांदगाव पेठ येथील स्व. हिरामण भिलकर यांची कन्या सौ. सुनंदा जनार्दन केचे या २०११ ते २०१६ दरम्यान पंचायत समिती सदस्य व महिला-बालकल्याण समिती सदस्य म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या कार्यकाळात नांदगाव पेठ जिल्हा परिषद हायस्कूलची नवी इमारत उभी करण्यात आली.सौ. केचे आजही आपल्या कार्यशील आणि लोकसंग्रही भूमिकेमुळे स्थानिक राजकारणात ओळख टिकवून आहेत. विकासकामे आणि दांडगा जनसंपर्क ही त्यांची ताकद मानली जाते. त्यामुळे काँग्रेसही या सर्कलमध्ये महिलांच्या माध्यमातून आपला हरवलेला गड परत मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. याशिवाय, भाजयुमो जिल्हाध्यक्ष सचिन इंगळे यांच्या पत्नी योगेश्वरी इंगळे आणि डिगरगव्हाण येथील सरपंच जिल्लेश्वरी ठाकरे या देखील संभाव्य उमेदवारांच्या चर्चेत असून, त्यांच्या प्रवेशामुळे निवडणुकीची रंगत अधिक वाढली आहे. सध्याच्या घडीला या सर्कलमध्ये महिलांचीच खरी चुरस पाहायला मिळत आहे.निवडणुकीपूर्वी कोण रिंगणात असणार आणि कोण बाहेर ही मात्र येणारी वेळच ठरवेल मात्र पुरुष नेतृत्वाऐवजी आता महिला उमेदवार विकास, सामाजिक काम आणि संघटनशक्तीच्या जोरावर रिंगणात उतरल्या आहेत.नांदगाव पेठ सर्कलचा हा राजकीय संघर्ष केवळ पक्षीय लढाई न राहता महिला नेतृत्वाच्या बळकटीकरणा चा प्रतीक ठरणार आहे

# आंदोलक आईच्या मृतदेहासह मुलीचे आंदोलन

## न्याय मिळेपर्यंत मृतदेह हलविणार नाही : विजया अठोर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१४ अमरावती** न्याय मिळावा यासाठी तब्बल सहा महिन्यांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणाऱ्या जेष्ठ नागरिक शांता अठोर यांचे सोमवारी (ता. १३) निधन झाले. त्यांच्या निधनानंतर मुलगी विजया उकर्ड अठोर (आठवले) यांनी आईचा (शांता अठोर) मृतदेह थेट जिल्हाकचेरी परिसरातील आंदोलनस्थळी आणला. संबंधितांवर जोपर्यंत कारवाई होणार नाही, तोपर्यंत मृतदेहासह आंदोलन करणार असल्याचा इशारा विजया अठोर यांनी दिला आहे.



जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्यानिवेदनात संबंधित अधिकाऱ्यांवर व आमदार खोडके दांपत्यासह माजी नगरसेवक अविनाश मार्डीकर यांच्यावर गंभीर आरोप करत कारवाईची मागणी विजया अठोर यांनी केली आहे. मनपामधील अनुकंपा नोकरी सावत्र मुलगा सागर याला बेकायदेशीरपणे देण्यात आली. तसेच शांताबाईचे घरकुल हडपल्याचा आरोप करीत २८ एप्रिल २०२५ पासून शांताबाई अठोर व विजया अठोर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. जेष्ठ नागरिक शांता अठोर, सहा महिन्यांपासून न्यायासाठी संघर्ष करीत होत्या. मात्र या काळात कोणत्याही अधिकाऱ्यांनी मागण्यांकडे लक्ष दिले नाही. दरम्यान शांताबाई दोनदा आजारी पडल्या तरी प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही. अखेरीस सोमवारी १३ ऑक्टोबरला शांताबाई यांचे निधन झाले, असे विजया अठोर यांनी सांगितले.शांताबाई यांच्या मृत्यूला प्रशासन व संजय खोडके, सुलभा खोडके व अविनाश मार्डीकर जबाबदार असल्याने त्यांच्यावर अॅट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत. जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उपजिल्हाधिकारी भटकर, पोलीस आयुक्त अरविंद चावरीया व मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्यावरसुद्धा कारवाईची मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे. याशिवाय सागर अठोर, आंकाश अठोर व कुंता अठोर यांना त्वरीत अटक करण्यात यावी, अशी मागणी विजया अठोर यांनी केली आहे.शांताबाई अठोर यांची अंत्ययात्रा बेनोडा येथील त्यांच्या स्वतःच्या घरातून काढण्यात येणार असून त्या घरातील सर्वांनी ते ठिकाण रिकामे करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. वडिलांच्या अनुकंपा नोकरी त्वरित देण्यात यावी, माझी आई ज्या जागेवर आंदोलन करीत होती, त्याच ठिकाणी तिचा मृतदेह आहे.

माझा जीव गेला तरी मी त्या ठिकाणावरून मृतदेह हलविणार नाही, असे विजया अठोर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# जि. प. च्या ५९ गटांसाठी आरक्षण जाहीर

## अनेक दिग्गजांना धक्का, सर्कलच बदलणार तर काहींना मिळेल




**विदर्भ प्रजासत्ताकदि.१४अमरावती १०**

जिल्ह्याचे मिनीमंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून निवडून जाण्याचे अनेकांचे स्वप्न धूसर झाले आहे. अमरावती जिल्हा परिषदेच्या ५९ गटांसाठी सोमवारी (ता.१३) काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीमुळे अनेक दिग्गजांचे मतदारसंघ गोठले, तर काहींना अन्य सर्कलची वाट धरावी लागणार आहे. यासोबतच जिल्ह्यातील १४ पंचायत समित्यांच्या सभापतिपदांसाठी सुद्धा आरक्षण सोडत काढण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात सोमवारी (ता.१३) सकाळी साडे दहापासून अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शिवाजी शिंदे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) ज्ञानेश्वर घ्यार आदींच्या उपस्थितीत सोडतीची प्रक्रिया पार पडली. ५९ सदस्यसंख्या असलेल्या जिल्हा परिषदेत ३० जागा महिलांसाठी राखीव राहणार आहेत. सोमवारी काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीमध्ये अनेक माजी पदाधिकाऱ्यांनी आपले हक्काचे मतदारसंघ गमावले असून काही मंडळींनी नजीकच्यासर्कलचा विचार सुरू केला आहे.

### पंचायत समिती सभापतिपदांचे आरक्षण पंचायत समिती : सभापती आरक्षण

१) नांदगाव खंडेश्वर : अनु. जाती
२) अंजनगाव : अनु. जाती महिला
३) अमरावती: अनु. जाती महिला
४) वरुड: अनु. जमाती
५) चांदूरबाजार: ना. मा. प्र.
६) दर्यापूर: ना. मा. प्र
७) धामणगावरेल्वे: ना. मा. प्र महिला
८) तिवसा: ना. मा. प्र महिला
९) चांदूररेल्वे: सर्वसाधारण
१०) अचलपूर: सर्वसाधारण
११) भातकुली: सर्वसाधारण महिला
१२) मोर्शी: सर्वसाधारण महिला
पूर्णतः (अनुसूचित क्षेत्र)
१३) धारणी: अनु. जमाती,
१४) चिखलदरा : अनु. जाती महिला.

# अंजनगाव पंचायत समिती गणाचे आरक्षण जाहीर

## आरक्षणामुळे स्थानिक पुढाऱ्यांत कही खुशी कही गम

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१४अंजनगाव सुर्जी** - आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या सहा गणासाठी आरक्षण तहसील कार्यालयाच्या सभागृहात दि.१३ ला उपविभागीय अधीकारी व तहसीलदार यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. अनुसुचित जातीची सर्वाधीक लोकसंख्या असलेल्या निर्वाचक गाणांपासुन उतरत्या समितीनिहाय स्वतंत्र उमेदवार क्रमाने जाहीर पैकी जागा विविध प्रवर्गासाठी आरक्षित झाल्या असून, पंचायत समिती सभापती पद अनुसुचीत जाती महीला करीता राखीव आहे .या आरक्षणात महिलांसाठी ०३ जागा राखीव ठेवण्यात आल्या असून, ०२ जागा महीला सर्वसाधारणसाठी खानमपुर (पांढरी) व कापुसतळणी गणात प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. अनुसूचित जातीसाठी ०१ महीला कोकर्डा करीता तर ०१ जागा नागरीकांच्या मागास प्रवर्गात सातेगाव गण राखीव आहे.०१ जागा चौसाळा या गणचा सर्वसाधारण मध्ये समावेश झाला असुन या गणावर आरक्षण निश्चित




करण्यात आले आहे.यामुळे अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या एकूण ०६ गणांपैकी ०३ जागा महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीत महिलांचे प्रतिनिधित्व दिसून येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे तर निवडणुक अधिकारी तहसीलदार पुष्पा सोळंके (दाबेराव) ना.तहसीलदार प्रकाष बमनोटे यांनी कामकाज पाहले जाहिर करण्यात आलेल्या गणनिहाय आरक्षणामुळे स्थानिक राजकीय समीकरणांमध्ये मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता प्रत्येक पक्ष आणि संभाव्य उमेदवार या नव्या आरक्षणानुसार आपली रणनिती आखनार आहे. या सोडती वेळी विविध पक्षाचे प्रतिनिधी तहसील कार्यालयात उपस्थित होते.

# कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार नामांकनाकरीता आवेदनपत्र आमंत्रित

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१४अमरावती** -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे आणि दानदाते स्व. द.ना. उपाख्य बबनराव दादा मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२५' प्रदान करावयाचा आहे. यावर्षी व्यक्ती गटात एक व संस्था गटात एक, अशा एकूण दोन पुरस्काराकरीता स्वतंत्र आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील श्री संत गाडगे बाबांच्या कृतीशील विचाराशी तसेच दशसूत्रीशी बांधीलकी असणारी व्यक्ती किंवा संस्थेला देण्यात येतो. पुरस्कारासाठी एखाद्या व्यक्तीने वा संस्थेने स्वत:हून नाव सादर करणे किंवा दुस-या कोण्या एखाद्या व्यक्तीची वा संस्थेची पुरस्कारासाठी शिफारस करणे किंवा नाव सूचविणे दोन्ही पध्दतीने नामांकन अर्ज स्वीकारण्यात येतील. संस्था किंवा व्यक्तीगत आवेदकांनी नामांकन आवेदन पत्रासोबत आपल्या जीवनाचा सविस्तर आलेख आणि पुरस्काराकरीता निश्चित केलेल्या निकषानुसार तसेच गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार सामाजिक क्षेत्रात कार्य केल्याचा पुरावा पाठविणे आवश्यक आहे.श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कारासाठी आवेदकांना दि. १० नोव्हेंबर, २०२५ पूर्वी विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र पाच प्रतीत "कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ४४४६०२" या पत्त्यावर पाठवावयाची आहेत. नामांकन आवेदनपत्र पाठवितांना




लिफाप्यावर कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२५" नामांकनाकरीता आवेदनपत्र हे ठळक अक्षरात लिहावे. व्यक्ती गट व संस्था गट अशा दोन पुरस्काराकरीता स्वतंत्र नामांकन आवेदनपत्र विहीत प्रपत्रात देण्यात आले आहे. विद्यापीठाव्दारे संकेतस्थळावर दिलेल्या नामांकन आवेदनपत्रानुसार ए-फोर साईज मधीलच संगणकीय नामांकन आवेदनपत्र स्वीकारण्यात येईल. ज्यांनी यापूर्वी सदर पुरस्काराकरीता विद्यापीठाला अर्ज सादर केले आहेत, त्यांनी यावर्षीच्या पुरस्कारासाठी अर्ज करुन मागील आवेदनपत्राचा विचार करावा, असा विनंतीपर अर्ज सादर करावा. अर्ज सादर करतांना त्यांचा केवळ मागीलवर्षी सादर केलेला अर्जच विचारात घेतला जाईल. त्यांना सदर अर्जासोबत त्यांच्या एका वर्षाच्या सामाजिक कार्याच्या माहितीचा प्रस्ताव नव्याने सादर करावा लागेल. विना प्रपत्र पाठविलेला अर्ज रद्द करण्यात येईल, अर्ज करण्यास इच्छुक व्यक्तींनी वा संस्थांनी www.sgbau.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर 'अवार्ड ॲन्ड अचिव्हमेन्ट' यामध्ये 'कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०२५' या लिंकवर विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र व पुरस्काराचे निकष यांची सविस्तर माहिती करून घ्यावी.

# चाहूल दिवाळीची ....शहरात रंगबिरंगी आकाशकंदील,पणत्या विक्रीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

विजयादशमी झाल्यानंतर ओढ असते ती दिवाळीची. दिवाळीचा सण अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत विविध प्रकारच्या वस्तू दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी बाजारपेठेतील रेलचेल वाढल्याचे दिसून येत आहे. बाजारपेठ विविध आकर्षक वस्तूंनी उजळून निघाली आहे. लक्षवेधी आकाश कंदिलांचा लखलखाट बाजारपेठेत वाढल्याचे दिसून येत आहे.

दिवाळीनिमित्त बाजारपेठ सजल्याचे दिसून येत आहे.दिव्यांच्या माळा लागल्या आहेत. हे आकाश कंदील ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. अंबादेवी मंदिर रस्ता, मोची गल्ली परिसर, इतवारा, राजकमल, गाडगे नगर तसेच शहरातील अन्य ठिकाणी रस्त्याच्या कडेला दुकाने सजली आहेत. आज बाजारपेठेत साधारणतः २० रुपयांपासून ते ५ हजार रुपयांपर्यंतचे आकाश कंदील आले आहेत. ते अर्ध्या फुटापासून तीन फुटापर्यंत आहेत. काही आकाश कंदील मोठ्या आकाराचेही आहेत. वेगवेगळ्या रंगाच्या दोऱ्या, विविध आकाराचे मणी, काचेचे तुकडे, नानाविध रंगाचा वापर करून त्यावर आकर्षक कलाकुसर करण्यात आली आहे. काही आकाश कंदिलांवर देव-देवतांची छायाचित्रे तर



काही आकाश कंदिलांवर विविध प्रकारचे छायाचित्रेही लावण्यात आली आहेत. आकर्षक कलाकुसर करण्यात आलेल्या आकाश कंदिलांना ग्राहकांची अधिक पसंती आहे. बाजारपेठेत इको फ्रेंडली आकाश कंदीलही आहेत. कापडी, कागदी आणि ज्युटपासून बनवलेले आकाश कंदील बाजारात मोठ्या प्रमाणावर आहेत. यंदाच्या दिवाळीतही पावसाची शक्यता असल्यामुळे कापडी, ज्युटपासून निर्मित आकाश कंदिलांना अधिक मागणी दिसून येत आहे.

**छोटे कंदील** :छोट्या कंदिलांमध्ये नेहमीच विविधप्रकार पाहायला मिळत असतात. विशेष म्हणजे कागदी आणि प्लास्टिकमध्ये छोटे कंदील मोठ्या प्रमाणात बनवले जातात. त्यानुसार, बाजारात कागदी आणि प्लास्टिकचे कंदील विक्रीसाठी आले आहेत.

### बाजारपेठेत दाखल झालेल्या आकर्षक कंदिलांचे प्रकार आणि किंमत

कागदी आकाश कंदिलाची किंमत ४०० पासून ८०० रुपयांपर्यंत आहे. याआधी हे कंदील २०० ते ५०० रुपयांपर्यंत मिळत होते. कापडी आकाश कंदिलाची किंमत १०० पासून १२०० रुपयांपर्यंत आहे. याआधी हे कंदील ५०० ते ९०० रुपयांपर्यंत मिळत होते. साडीचा वापर करून तयार केलेले कंदील १२०० ते १४०० रुपयांपर्यंत आहेत. याआधी हे कंदील ७०० ते १०० रुपयांपर्यंत मिळत होते.प्लास्टिक आणि विविध वस्तूंचा वापरकरून बनवलेले कंदील याआधी ५०० रुपयांपर्यंत मिळत होते. यंदा या कंदिलांच्या किमती वाढल्या असून ७०० ते ८०० रुपये झाली आहे.


# निवडून आयोगाचा गलथान कारभार उघड

## एक नव्हे तर अख्खे गावेच्या गावे मतदार यादी मधुन गायब

## सरपंच शशिकांत मंगळे यांनी प्रारुप याद्यावर घेतला आक्षेप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अंजनगाव सुर्जी –** २महाराष्ट्रातील २०२२ पासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये जाहीर करण्यात आल्या. त्याअनुशंगाने प्रारूप मतदार याद्या जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सर्व तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयात निरीक्षणासाठी उपलब्ध करण्यात आल्या असताना अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मतदार प्रारूप याद्यांमध्ये अनेक गावांची नावे मतदार यादीत नसून चुकीच्या पद्धतीने प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्याची हरकत कसबेगव्हाणचे सरपंच शशिकांत मंगळे यांनी दाखल केली आहे.त्यांनी निवडणूक आयोग व त्याच्या यंत्रणेच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मतदार याद्या तपासूनच अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात यावी व अमरावती जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यांतील याद्याही पडताळून नंतरच अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे.जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या निवडणूक कार्यक्रमानंतर दि. २५/९/२०२५ रोजी निर्वाचक गट व गणांची प्रारूप यादी प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. नागरिकांना त्यांच्या सूचना व हरकती विहित वेळेत दाखल करण्यास सांगण्यात आले होते. त्या अनुषंगाने कसबेगव्हाणचे सरपंच शशिकांत मंगळे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी व तहसीलदार अंजनगाव सुर्जी यांच्या कार्यालयात हरकत दाखल केली आहे.सदर आक्षेप अर्जात तालुक्यातील गट क्रमांक १० कापुसतळणी, ११ भंडारज, १२ सातेगाव तसेच गण क्रमांक १९ खानमपुर पांढरी, २० कापुसतळणी, २१ चौसाळा, २२ भंडारज, २३ सातेगाव व २४ कोकर्डा या सहा गणांतील अनेक गावांची नावे सुटल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामध्ये खानमपुर पांढरी गणातील टाकरखेडा मोरे, धनेगाव; कापुसतळणी गणातील अहमदपूर (टाकरखेडा मोरे), रौदळपूर (कापुसतळणी), पोही, रत्नापूर (पोही), जवळा बु., जवळा खुर्द, औरंगपूर (कसबेगव्हाण), सैदापूर (कसबेगव्हाण); चौसाळा गणातील डोंगरगाव (तुरखेड); भंडारज गणातील मलकापूर बु., अडगाव खाडे, नवापूर (अडगाव खाडे), मासमापुर (अडगाव खाडे), मुर्तीजापुर घोगर्डा (अडगाव खाडे), हसनापुर पार्डी, शिरजगाव (हसनापुर पार्डी), कारला, निमखेड आडे (कारला), जवर्डी, धुळकी ही गावे मतदार यादीतून वगळली असल्याचे दिसून आले.तसेच भोकरी हे गाव सातेगाव गणामध्ये चुकीने समाविष्ट करण्यात आले आहे, अशी नोंद आक्षेपात करण्यात आली आहे. याशिवाय सातेगाव गणातील हंतोडा, मोहब्बतपूर (हंतोडा), खुदानपूर (विहिगाव), अडगाव आडे (विहिगाव), गणेशपूर (निंभारी) तसेच कोकर्डा गणातील सर्फाबाद (हयापूर) ही गावे यादीतून गहाळ असल्याचे नमूद करण्यात आले आहे.यादी भागानुसार मतदार क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक अनुक्रमे नसून विस्कळीत पद्धतीने प्रारूप यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. विशेष म्हणजे काही गावे 'उजाड' असल्याचे नोंद असूनही, त्या गावांच्या नावासमोर उजाड टाकून दाखवण्यात आले नाही, हे विशेष आहे.आक्षेप नोंदविण्याची अंतिम तारीख १४ ऑक्टोबर असूनही इतक्या मोठ्या त्रुटी असताना कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा तालुक्यातील प्रमुख नेत्यांनी ही चूक लक्षात घेतली नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तहसिलदार पुष्पा सोळंके ( दाभेराव ) यांना विचारणा केली असता काही गावांची नावे सुटल्याचे आमच्या लक्षात आल्यानंतर आम्ही निवडणूक आयोगाला पत्र दिल्याचे तहसीलदारांनी सांगितले



मतदार यादीतून अनेक गावांची नावे गहाळ राहणे ही अत्यंत गंभीर व निष्काळजीपणाची बाब आहे. लोकशाही प्रक्रियेचा पाया असलेल्या निवडणुकीत अशा चुका अस्वीकार्य आहेत. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील प्रारूप मतदार यादीची तात्काळ तपासणी करून दुरुस्ती करण्यात यावी, ही आमची ठाम मागणी आहे. जनतेच्या मताधिकारावर कुणाच्याही निष्काळजीपणामुळे गदा येऊ देणार नाही.

**शशिकांत मंगळे, सरपंच कसबेगव्हाण.**

## नेहरू मैदान हॉकर्स झोनसाठी उपलब्ध करून द्यावे

## व्यावसायिकांचे महापालिका आयुक्तांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**

अमरावती शहराच्या मध्यवर्ती असलेल्या नेहरू मैदानाची जागा हॉकर्स झोनसाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी हॉकर्स व्यावसायिकांनी केली आहे. सध्या शहरात महानगरपालिकेकडे हॉकर्ससाठी कोणतीही जागा उपलब्ध नसल्याने अनेक व्यावसायिक अडचणीत आहेत. नेहरू मैदान ही जागा भाजी, फळविक्रेते व खाण्यापिण्याच्या गाड्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून, याठिकाणी रोजच्या कराच्या अटीवर व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी, असे निवेदन गणेश मारोडकर (संस्थापक अध्यक्ष), दीपक लोखंडे (जिल्हाध्यक्ष), जावेद शेख व सुरज चढार (उपाध्यक्ष) यांनी दिले आहे. या निर्णयामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल, शहरातील अतिक्रमण कमी होईल आणि रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. मैदान स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी व्यावसायिक स्वतः घेणार असल्याचेही आश्वासन देण्यात आले आहे.



## राज्याच्या हवामानात बदल होणार

## रजेवर गेलेला पाऊस दिवाळीत विदर्भातील काही भागात हजेरी लावणार ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती –** जुलैसोबतच ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये मुंबईसह राज्यभरात थैमान घालणारा पाऊस आता दिवाळीतही पडणार आहे. १५ ते २० ऑक्टोबर (नरक चतुर्दशी) दरम्यानच्या सहा दिवसांत महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहील.

राज्याच्या हवामानात बदल होणार असून, १५ ते १८ ऑक्टोबरदरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामान आणि दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे.वादळी वाऱ्यासह येणाऱ्या पावसाचे सर्वाधिक प्रमाण विदर्भ आणि मराठवाड्यात असू शकते. अनेक भागांमध्ये ढगाळ हवामान अथवा वादळी पावसाचा अंदाज राहील.




या कालावधीत तुरळक ठिकाणी मध्यम ते किरकोळ पावसाचा अंदाज असून, १५ व १६ ऑक्टोबरला संपूर्ण महाराष्ट्रात मध्यम पावसाची शक्यता आहे.तुलनेत खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा वादळी पाऊस पडेल, तर मुंबईचे आकाश निरभ्र राहणार असून, हवेच्या गुणवत्तेचा दर्जा मध्यम राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**परतीचा मान्सून सध्या कुठे ?**

हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, परतीच्या मान्सूनने सोमवारी उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, झारखंड, ओरिसा, छत्तीसगड, महाराष्ट्र, गोवा ओलांडून कर्नाटक, तेलंगणा, पश्चिम बंगाल व पूर्वोत्तर राज्यात प्रवेश केला आहे.

परतीच्या मान्सूनची सीमा रेषा कारवार, कलबुर्गी, निझामाबाद, गुवाहाटीतून जात असून, देशाच्या एकूण परतीच्या क्षेत्रापैकी ८५ टक्के भागातून मान्सूनने माघार घेतली आहे. दरवर्षी मान्सून साधारणतः देशातून सरासरी १५ ऑक्टोबर दरम्यान माघार घेतो. येत्या दोन ते तीन दिवसात देशाच्या उर्वरित १५ टक्के भूभागावरून मान्सून परतेल, असा अंदाज आहे.

## अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळाची निवडणूक

## प्रकाश वाघ यांची सर्वाधिकारी, उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, प्रचार प्रमुख गोपाल कडू यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ गुरुकुंज मोझरी**

अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचे सन२०२५-२०२८ यावर्षाकरिता नवीन कार्यकारिणी करिता झालेल्या निर्वाचण सभेत प्रकाश वाघ यांची सर्वाधिकारी तर उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील व प्रचार प्रमुख गोपाल कडू यांची एकमताने निवड करण्यात आली. सरचिटणीस पदी जनार्दन बोथे यांना कायम ठेवण्यात आले. कार्यकारिणी सदस्य म्हणून श्री दामोदर श्रावणजी पाटील (वर्धा), श्री राजू तुळशीरामजी देवतळे (चंद्रपूर), ॲड. दिलीप कमलाकर कोहळे (अमरावती), श्री रविंद्र माधव राव मुंडगांवकर (अकोट), श्री रामदास भीमराव देशमुख (दर्यापूर), सौ.पौर्णिमा विजय राव सवाई (टाकरखेडा संभू), श्री भाष्कर बळवंत पवित्रकार (दर्यापूर), श्री गणेश महादेवराव जवंजाळ (बुलढाणा), सौ.शुभांगी सुनीलराव वानखडे (नागपूर) यांना निवडण्यात आले. निर्वाचन सभेचे कामकाज श्याम मुंडगांवकर यांनी सांभाळले. सर्वाधिकारी प्रकाश वाघ, उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, प्रचार प्रमुख गोपाल कडू तसेच कार्यकारिणी तील सदस्यांना अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळा च्या संचालक मंडळाच्या अध्यक्षा पुष्पा बोंडे यांनी प्रार्थना मंदिरात पद व सेवेची शपथ दिली.



## सरकारी निधी अभावी पोषण आहार योजनेचे 'कुपोषण'..... काय आहे परिस्थिती ?

### प्राथमिक शिक्षक समितीची निधीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**

राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहार योजनेचा निधी शाळांना गेल्या चार महिन्यांपासून मिळालेला नाही. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यापासून निधीच मिळालेला नसल्याने पोषण आहार योजनेसाठी शाळांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शिक्षकांनाच पदरमोड करून पोषण आहार उपलब्ध करावा लागत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. पुढील चार दिवसांत शाळांना चार महिन्यांचा निधी एकत्रित वितरित केला जाणार असल्याचे स्पष्टीकरण शिक्षण विभागाने दिले. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, शासकीय शाळा, अनुदानित शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार योजना राबवण्यात येते. त्यात पहिली ते पाचवी विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक, १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक, २० ग्रॅम प्रथिनेयुक्त भोजन देण्यात येते. त्यासाठी शासननियुक्त पुरवठादाराकडून शाळांना तांदूळ, कडधान्ये, तेल, तिखट, मीठ, मसाला, मोहरी, जिरे अशा धान्य मालाचा पुरवठा केला जातो. ग्रामीण भागात स्वयंपाक्यांकडून आहार शिजवून घेऊन विद्यार्थ्यांना दिला जातो, शहरात केंद्रीय स्वयंपाकघरातून आहार पुरविण्यात येतो. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले, 'पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीत प्रचंड बेफिकिरी आहे. योजनेचे कोणतेही अनुदान अग्रीम स्वरूपात दिले जात नाही. तसेच, दोन दोन-तीन महिने अनुदान मिळत नाही. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यापासून गेल्या चार महिन्यांपासून इंधन, भाजीपाल्याचे अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागात कोणताही बचत गट किंवा स्वयंपाकी या योजनेचे काम स्वीकारत नाही. शालेय पोषण आहार देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीची आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक हे शेतमजूर, कष्टकरी, गरीब कुटुंबातील असतात. हेच पालक शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी असतात. ते शालेय पोषण आहार योजनेमध्ये खर्चाचा हातभार उचलू शकत नाहीत. त्यामुळे शिक्षकांनाच पदरमोड करून ही योजना चालवण्याची वेळ आली आहे.'



### चार दिवसात निधी वाटपाचे शिक्षण संचालक यांचे आश्वासन

कोड- केंद्र आणि राज्य सरकारकडून पोषण आहार योजनेसाठीचा निधी नुकताच प्राप्त झाला आहे. पुढील चार दिवसांत चार महिन्यांचा एकत्रित निधी शाळांना वितरित केला जाणार आहे.शरद गोसावी, संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय-

## दोन वेच्यातच कपाशीची उलंगवाडी, शेतकऱ्यांची दिवाळी मात्र अंधारातच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ तिवसा–** भारता सारख्या कृषीप्रधान देशात जीवनावश्यक वस्तूच्या महागाईने कहर केला आहे. त्यातून शेतीही सुटलेली नाही. खते, औषधांच्या वाढत्या किंमतीमुळे शेतकरी होरपळून गेला असून, शेती कसायची तर हातात पैसा नाही, सोडायची तर पोराबाळांच्या पोटाला काय घालायचे, असा प्रश्न घेऊन शेतकरी शेतीचा गाडा ओढत आहे. खते, रासायनिक खते, तणनाशके, कीटकनाशके यावर १८ टक्के जीसटी लावण्याचे काम सरकारने केले असून शेतमालाला भाव नसल्याने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहेत.आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या दावणीला शेतकऱ्यांना बांधण्यात येत आहे. याचा परिणाम शेतीच्या अर्थकारणावर झाला असून कृषी प्रधान देशातील शेत जमिनी उद्ध्वस्त होत आहे. गेल्या दोन ते तीन वर्षात कीटकनाशक, तणनाशक व खतांच्या दरात झालेल्या वाढीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे शेती करायची की, सोडून द्यायची, अशी वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. सतत कोसळणाऱ्या पावसाच्या आणि अतिवृष्टी पावसाच्या संकटातून यावर्षी सुद्धा शेतकरी आजही संघर्ष करताना दिसत आहे. तसेच यावर्षीसुद्धा अतिवृष्टी पावसाच्या संकटाने शेतकऱ्यांना दगा दिला. त्यामुळे तिवसा तालुक्यात आत्महत्या वाढताना दिसत आहे. त्यामुळे यंदाचे सोयाबीन, कापूस, तूर पीक आणि संत्रा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने उत्पन्न कमी झाले आणि कवडीमोल भावसुद्धा मिळाला. सततच्या पावसामुळे संत्रा पिकावर फायप्टोप्थोरा बुरशी वाढ झाली असून अख्खी संत्रा बाग खाली आली आहे. संत्रा उत्पादक शेतकरी सुद्धा मोठ्या संख्येने संकटात सापडला आहे. कपाशी पूजन सितादहीच्या अंदाजवरून माझ्या लक्षात आले की यंदाही दिवाळी उसणवारीवर होणार आहे. शेतकरी अंधारात असल्याने शेतकऱ्यांची दिवाळी सुद्धा अंधारातच जाणार आहे. कारण शेतकरी आपल्या काळया आईसोबत बेईमान झाला आहे. शेतकरी हा विलनीकरणात सामील झाला आहे. त्यामुळे मी शेती अभ्यासक निखिल तेटू शेतकऱ्यांना नेहमी कमी खर्चिक शेती व्यवस्थापन बाबत माहिती देत असतो. शेतीवरील खर्च कमी कसा होणार असे माहिती रोज देत असतो, तसेच कापूस हे पीक शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था सांभाळणारे नगदी पीक असल्याने अनेक शेतकरी या पिकाला सर्वात मोठे प्राधान्य देत असतात आणि काही वर्षापूर्वी कापसाला भावही थोडाफार चांगला मिळत असल्याने पेरणी क्षेत्रात वाढ झाली आहेत. परंतु यावर्षी सततच्या पावसामुळे कपाशी पिकांच्या मुळांची अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली थांबल्याने कपाशी सुकायला लागली आहेत. त्यामुळे कपाशी पिकांची पाने लालसर होऊन अख्खे कपाशीचे प्लॉट लालसर होऊन पूर्ण वाया जात आहे. अशातच शेतकऱ्यांनी सितादही केली असून हा कापूस घरी आल्यानंतर शेतकऱ्यांना एक ते दोन वेच्यातच कापसाची उलंगवाडी होण्याचे चित्र दिसत आहे. कारण पिकांना फुल, पाती कुठेच दिसत नाही आहे. कपाशी झाडावर परिपक्व झालेले फक्त दहा बारा बोंडे दिसत आहे. शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास मातीमोल झालेला दिसत आहे. कपाशी या पिकांवर हजारोचा खर्च करूनसुद्धा उत्पादन होणार की नाही, लावलेला खर्च निघणार की नाहीत, मालाला योग्य हमीभाव मिळणार की नाही, याचं प्रकारची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहेत. यामुळे सर्व समस्यामुळे उत्पन्नात मोठी घट होणार, हे मात्र निश्चित आहे. उन्हाच्या प्रखरतेमुळे कापसाची बोंडे फुटून कापूस वेचणीसाठी लवकर मिळत आहे. त्यामुळे लवकर पीक खाली होणार आहे, हे दिसत आहे. त्यामुळे सर्व शेतकरी मित्र चिंतेत दिसत आहे. कपाशी पीक हे बहुतांश निसर्गावर अवलंबून आहे. अशा शेतकऱ्यांना अधिक फटका बसल्याचे भयानक वास्तव दिसत आहे. सरकार खरंच मदत करतील का, अनुदान देतील का ही शंका सर्व शेतकऱ्यांच्या मनात उपस्थित झाली आहे. तुटपुंजी मदत नकोय प्रति हेक्टरी ५० हजार रुपये सरसकट मदत करावी अशी मागणी कुऱ्हा येथील एकजूट शेतकरी संघटनेच्या वतीने होत आहे. काही शेती शिवार मंडळे वगळल्याने शेतकरी गोंधळून गेला आहे. सरकार मदतीकडे डोळे लागल्याचे दृश्य दिसत आहे. शेतकऱ्यांमध्ये संभ्रम तयार झाला आहे.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत